# विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, मुंबई.

जवाहर बालभवन, तळमजला नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी क्र.०२२/२३६३००८४/८६ फॅक्स क्र.२३६३००९०
ई-मेल-dd.mumbai@mahedu.gov.in, dydemumbai@yahoo.com


## // इतिवृत्त //

पूर्वपीठीका :-

शासनाकडून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित अधिनियम २०१२ अंतर्गत महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० हे दि.०५.१०.२०२० रोजी अधिसूचित करण्यात आले आहेत. सदर नियमान्वये नवीन शाळा मान्यता तथा विद्यमान शाळेची दर्जावाढ करण्याकरिता अर्ज करण्याची कार्यपध्दती, इरादा पत्र देण्याची कार्यपध्दती तसेच मान्यता पत्राकरिता अर्ज करण्याची व मान्यता पत्र देण्याची कार्यपध्दती विहित केलेली आहे. त्याचप्रमाणे स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर अर्ज स्विकारण्यासाठी आणि त्याची छानणी करण्यासाठी राज्यस्तरीय प्राधिकारी आणि क्षेत्रस्तरीय प्राधिकारी यांची नियुक्ती, त्यांचे अधिकार व कर्तव्ये आणि कामकाज चालविण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती यांबाबतही नियमांमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० (दि.०५.१०.२०२०) मधील नियम १५ अन्वये शासनाकडून इरादापत्र प्राप्त झाल्यानंतर मान्यता पत्र मिळणेसाठी संबंधित संस्था/अर्जदार यांच्याकडून ऑफलाईन पध्दतीने क्षेत्रस्तरीय प्राधिकरणास प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्तावांपैकी शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई जिल्ह्यातील एकूण ०२ शाळांच्या अर्जांची / प्रस्तावांची पडताळणी करण्यासाठी आज दिनांक.३१.०१.२०२३रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०२:०० वा. या कालावधीमध्ये अधिसूचनेतील तरतूदीप्रमाणे अध्यक्ष, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सदस्यांची उपस्थिती होती.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पद | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | श्री.देविदास महाजन | सदस्य, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण तथा शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई दक्षिण विभाग, मुंबई | 3.2.2 |
| २ | श्री.बी.टी.पाटील | सदस्य सचिव, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण तथा शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण विभाग, मुंबई यांचे कार्यालय, परेल, मुंबई. | 3/2/23 |

अधिनियमातील कलम ११ (ग) नुसार बैठकीच्या गणपूर्तीसाठी, किमान तीन सदस्यांची आवश्यकता असेल, अशी तरतूद आहे. त्यानुसार बैठकीस उक्तप्रमाणे अध्यक्षांसह सदस्यांच्या उपस्थितीमुळे बैठकीची गणपूर्ती झाली. बैठकीच्या सुरूवातीस सर्वप्रथम अध्यक्षांनी बैठकीच्या आयोजनाबाबत व उक्त नमूद अधिनियमातील इरादा पत्र/मान्यता पत्र देण्यासाठी आवश्यक कार्यपध्दतीबाबतही उपस्थित सदस्यांशी चर्चा केली

शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई दक्षिण विभाग, परेल, मुंबई यांच्या कार्यक्षेतील इरादा प्राप्त झालेल्या शाळांना शासनाकडून मान्यता पत्र मिळण्यासाठी एकुण ०२ संस्थांचे अर्ज/ प्रस्ताव समितीसमोर सादर करण्यात आले. सदर एकूण ०२ अर्ज/प्रस्तावांपैकी एकूण ०२ अर्ज/प्रस्ताव पात्र असून विहित निकषांची पूर्तता करीत आहेत.

**पात्र झालेले अर्ज/प्रस्ताव :-**

१. दि जनरल एज्युकेशन इन्स्टिटयुट, दादर, मुंबई संचलित जी.ई.आयस् छबीलदास इंग्लिश मिडियम स्कूल, अक्षीकर स्ट्रीट, माहिम, मुंबई नवीन शाळा - प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ. १ ली ते इ. १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम)
२. दि बॉम्बे डायोसेसन सोसायटी फॉर एज्युकेशनल मेडीकल ॲण्ड वेल्फेअर वर्क, हजारीमल सोमानी मार्ग, मुंबई संचलित गुड शेफर्ड इंग्लिश स्कूल, धारावी, मुंबई -- १७ दर्जावाढ शाळा - प्राथमिक ते उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक (इ. ९ वी ते इ. १० वी, इंग्रजी माध्यम)

अधिनियमातील अनुसूची "ख" मध्ये विनिर्दिष्ट केलेले दस्तऐवज व अधिसूचनेतील इतर निकष पूर्ण करणाऱ्या पात्र संस्थांचे/अर्जदारांचे अर्ज/प्रस्ताव राज्य स्तरीय प्राधिकरणास सादर करावेत, असे सर्वानुमते ठरले. विषयांकीत प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता वेळोवेळी आयोजित करण्यात येणाऱ्या बैठकांसाठी सर्व सदस्यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे, अशा सचूना सर्व उपस्थितांना अध्यक्षांमार्फत देण्यात आल्या व बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

(संदीप संगवे)
अध्यक्ष,
क्षेत्र स्तरीय प्राधिकरण तथा
विभागीय शिक्षण उपसंचालक
मुंबई.

दक्षिण विभाग

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२, अंतर्गत नवीन शाळा प्राप्त प्रस्तावाची क्षेत्रिय समितीमार्फत छाननी करून पात्र / अपात्र प्रस्ताव अंतिम अहवाल

| अ. क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | मंडळ | शाळेचा प्रकार | सादर केलेले दस्तऐवज | पात्र / अपात्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 1 | दि जनरल एज्युकेशन इन्स्टिट्युट, दादर, मुंबई | **जी.ई.आयस** छबीलदास इंग्लिश मिडियम स्कूल, अक्षीकर स्ट्रीट, माहिम, मुंबई | इंग्रजी | राज्यमंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ. 1 ली ते 12 वी, सर्व शाखा) | 1.संस्था नोंदणी प्रमाणपत्र व संस्थेची घटना सहा.धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातून प्रमाणित करून सादर केल्या आहेत. 2. शाळा ज्या जागेवर प्रस्तावित आहे ती जागा संस्थेच्या नावाने असल्याबाबत मालमत्ता पत्रक सादर केले आहे. 3.शाळेच्या इमारतीच्या बांधकामाबाबत बांधकाम परवानगी व नकाशा तसेच बांधकाम पूर्णत्व/भोगवटा प्रमाणपत्राबाबत हमीपत्र सादर केले आहेत. 4. मागील तीन आर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवाल व ताळेबंद सादर केले आहेत. 5. छाननी शुल्क स्वरुपात विहित रक्कम शासन खात्यात भरून त्याचे चलन सादर केले आहे. 06. संस्थेच्या खात्याचे बँक शिल्लक प्रमाणपत्र सादर केलेले आहे. 7. विहित रक्कम मुदत ठेव स्वरूपात शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण विभाग, मुंबई व संबंधित संस्था यांच्या संयुक्त नावे राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवण्यात आली आहे. 8.अद्ययावत चेंज रिपोर्ट सादर केला आहे. | पात्र |

(बी.टी. पाटील) 6/2/23
सदस्य सचिव, क्षेत्र स्तरीय प्राधिकरण
तथा उशिक्षण उप निरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण विभाग
मुंबई यांचे कार्यालय मुंबई

(देवीदास महाजन) 8.2.23
सदस्य, क्षेत्र स्तरीय प्राधिकरण तथा
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण विभाग
मुंबई

(संदीप संगवे)
अध्यक्ष, क्षेत्र स्तरीय प्राधिकरण तथा
विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई

Mrs. A. M. Ahire
Principal

Secretary
General Education Institute
DADAR, Mumbai - 28